मंत्रालयीन सेवा

महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग
मंत्रालय (मुख्य इमारत), ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०० ०३२.

---

क्रमांक:- संकिर्ण-२०२४/प्र.क्र. १५/नों.शा. दिनांक : १८ मार्च, २०२५.

प्रति

संचालक,
माहिती तंत्रज्ञान संचालनालय,
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

विषयः- गृहनिर्माण विभागातील निर्लेखित वाहन क्र. MH-०१-AN-९११ (Toyota Altis १.८ VLYD (Petrol) आणि वाहन क्रमांक MH ०१ SA ४१४२ ( Honda City) ची लिलावाने विक्री करण्यासंदर्भात निविदा मागविण्याकरीता प्रसिध्दीपत्रक <u>शासनाच्या वेबसाईटला प्रसिध्द करणेबाबत.</u>

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत आपणांस विनंती करण्यात येत आहे की, गृहनिर्माण विभाग (खुद्द) कार्यालयातील, निर्लेखित केलेले वाहन क्र. MH-०१-AN-०९११(Toyota Altis १.८ VLYD (Petrol) आणि वाहन क्रमांक MH ०१ SA ४१४२ ( Honda City Petrol) ची विक्री करण्यासाठी इच्छुक निविदाधारकाकडून निविदा मागविण्यासाठी शासन संकेतस्थळ (intranet.maharashtra.gov.in) वर निविदा प्रसिध्द करण्यात याव्यात.

२. त्यामध्ये निविदा सादर करण्याचा दिनांक ०२.०४.२०२५ असा नमूद करण्यात आलेला आहे आणि निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक १७.०४.२०२५ असा नमूद करण्यात आलेला आहे.

१८/०३/२५
(प्रशांत राठोड)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत :- माहितीकरिता
१. अ.स. (रोखशाखा), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. निवडनस्ती.

C:\Users\shubhangi.nemane\Downloads\गृहनिर्माण वाहन सद्यस्थिती (१).docx

Tender Notice for the sale of Write Off Used Cars in Housing Department.

गृहनिर्माण विभागातील निर्लेखित करण्यात आलेल्या गाडयांची विक्री करण्यासाठी निविदा सूचना.

<u>गृहनिर्माण विभागातील निर्लेखित वाहनांच्या विक्रीबाबत नियम, अटी व शर्ती.</u>

१. गृहनिर्माण विभागातील निर्लेखित केलेले केलेले वाहन क्र. MH-०१-AN-०९११(Toyota Altis १.८ VLYD (Petrol) **आणि वाहन क्रमांक MH ०१ SA ४१४२** ( Honda City Petrol) निविदा पध्दतीने **जेथे आहे व जसे आहे तसे** विक्री करणे आहे.

२. उपरोक्त वाहन गृहनिर्माण विभाग, कार्यासन-नोंदणीशाखा, ३ रा मजला (मुख्य), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांचे मार्फत **दिनांक २० मार्च, २०२५ ते दिनांक ०१ एप्रिल, २०२५ या दिवसांच्या कालावधीत दुपारी २.३० ते ४.०० या** वेळेत (सुटीचे दिवस वगळून) पहाण्यासाठी उपलब्ध आहेत. ज्या इच्छुक खरेदीदारास सदर साहित्य/वस्तू खरेदी करावयाचे आहे त्यांनी सदर साहित्य/वस्तूंची प्रत्यक्ष पाहणी करुन, कक्ष अधिकारी. गृहनिर्माण विभाग, कार्यासन (रोखशाखा), दालन क्र. २५४ (मंत्रालय-विस्तार),मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई- ४०० ०३२, यांच्याकडे **रुपये १००/- (ना-परतावा) भरणा करुन त्यांचेकडून रकमेची पावती व निविदा नमुना अर्ज प्राप्त करावा अथवा, "Under Secretary, Housing Department " यांच्या नावे पुढील बँक खात्यावर रु.१००/- चा ऑनलाईन भरणा करुन शासनाच्या** https://www.maharashtra.gov.in **या संकेतस्थळावरुन निविदा नमुना अपलोड (Upload) करावी.**

```
Bank Name :     Bank of Maharashtra
Account No.:    60355546027
IFSC code   :   MAHB0001388
```

३. इच्छुक खरेदीदाराने खरेदी करावयाचे वाहन (देकार) विहित निविदा नमुन्यामध्ये नमूद करुन )**" अवर सचिव, गृहनिर्माण विभाग, कार्यासन(रोखशाखा), दालन क्र. २५४ (मंत्रालय-विस्तार),मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई- ४०० ०३२,"यांच्या नावे रुपये ५०००/- (अक्षरी रुपये पाच हजार फक्त) च्या <u>अनामत रकमेच्या</u> धनादेशासह बंद लिफाफ्यात दि. २० मार्च, २०२५ ते दि. ०१ एप्रिल, २०२५ या कालावधीत दुपारी २.३० ते ४.०० या वेळेत** कार्यासन अधिकारी (कार्यासन-नोंदणीशाखा),३ रा मजला गृहनिर्माण विभाग, (मंत्रालय-मुख्य),मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई- ४०० ०३२,या कार्यालयात समक्ष सादर करावेत. **निविदा अंतिमरित्या सादर करण्याचा दि. ०१ एप्रिल, २०२५ दुपारी ४.००** वाजेपर्यंत राहील. ०१ **एप्रिल, २०२५** नंतर विहित वेळेनंतर सादर केलेल्या व पोस्टाने पाठविलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत. यास्तव, आपली निविदा वरील कार्यालयात अंतिम दिनांकापूर्वी व वेळेत पोहोचविण्याची जबाबदारी संबंधित निविदाधारकाची राहील. याबाबत कोणतीही तक्रार स्विकारण्यात येणार नाही.

४. सदर विक्री ही निविदा पध्दतीने करण्यात येणार असल्याने निविदेच्या बंद लिफाफ्यावर **" निर्लेखित वाहन खरेदीसाठी निविदा "** असे स्पष्ट नमूद करुन निविदा सादर करण्यात यावी. **निविदाधारकाने निविदा अर्जासोबत उपरोक्त अ.क्र.३ येथे नमूद केल्याप्रमाणे अनामत रकमेचा धनादेश जोडणे आवश्यक आहे. अन्यथा, निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.**

५. निविदाधारकाने **निविदा सादर करताना पॅनकार्ड, आधारकार्ड, दुकान (असल्यास) नोंदणीचा पुरावा तसेच, जुने वाहन निर्लेखित करण्यात आलेले खरेदी करण्याबाबतचे प्रमाणपत्र** यांची प्रत स्वतंत्ररित्या (लिफाफ्यात बंद न करता ) सादर करणे आवश्यक राहील.

६. निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ निविदाधारकांना कळविण्यात येईल. निविदा उघडण्याच्या विहित दिनांक व वेळेस संबंधित निविदाधारकास किंवा त्याच्या प्रतिनिधीस व्यक्तीश: उपस्थित राहता येईल. संबंधित निविदाधारक अनुपस्थित राहील्यास सदर निविदा उपस्थित निविदाधारक/प्रतिनिधींसमोर उघडण्यात येईल. कोणताही निविदाधारक उपस्थित न राहील्यास त्यांच्या अनुपस्थित निविदा उघडण्यात येतील. याबाबत अनुपस्थित निविदाधारकांची कोणतीही तक्रार स्विकारण्यात येणार नाही.

(कृ.मा.प.)

७. प्रत्येक निर्लेखित साहित्य/वस्तूनिहाय निविदेच्या रकमेत कमी/जास्त तफावत असली तरी विभागाने निश्चित केलेल्या विक्रीच्या किंमतीपेक्षा (Upset Price) सर्वात जास्त एकूण रकमेची निविदा सादर करणाऱ्या निविदाधारकास सदर निविदा प्रक्रीयेमध्ये "यशस्वी निविदाधारक " म्हणून घोषित करण्यात येईल.

८. यशस्वी निविदाधारकाने मंजूर निविदा रकमेतून अनामत रक्कम वजा जाता उर्वरित रकमेचा कार्यालयीन पाच दिवसात (सुटीचे दिवस वगळून)" अवर सचिव, गृहनिर्माण विभाग, कार्यासन(रोखशाखा), दालन क्र. २५४ (मंत्रालय-विस्तार),मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई- ४०० ०३२," यांच्याकडे रोख किंवा डिमांड ड्राफ्ट स्वरुपात भरणा करणे आवश्यक राहील. अन्यथा, त्याची निविदा रद्दबातल ठरविली जाईल व उपरोक्त अ.क्र. ७ मध्ये नमूद केलेल्या निवड प्रक्रीयेनुसार द्वितीय क्रमांकाच्या रकमेची निविदा सादर करणाऱ्या निविदाधारकास यशस्वी निविदाधारक म्हणून घोषित करण्यात येईल.

९. यशस्वी निविदाधारकाने निविदेची रक्कम भरणा केल्यानंतर पाच दिवसात सदर वाहन आहे त्या ठिकाणावरुन स्वखर्चाने ताब्यात घेणे आवश्यक राहील. त्यासाठी, गृहनिर्माण विभागामार्फत कोणतेही मनुष्यबळ किंवा इतर खर्च देण्यात येणार नाही. तसेच, निविदा मंजूरीनंतर सदर साहित्य/वस्तू वाहतूक करताना/ताब्यात घेताना आवश्यक असलेले शुल्क/कराचा भरणा किंवा अनुषंगिक खर्चाची जबाबदारी संबंधित निविदाधारकाची राहील.

१०. यशस्वी निविदाधारकाने निविदा मंजूरीनंतर कोणत्याही कारणास्तव साहित्य/वस्तू घेण्यास नकार दिल्यास त्याने जमा केलेली अनामत रक्कम जप्त करुन शासन जमा करण्यात येईल व सदर रक्कम कोणत्याही परिस्थितीत संबंधित निविदाधारकास परत करण्यात येणार नाही.

११. निविदेबाबत निविदाधारकाची कोणतीही अट/शर्त स्विकारली जाणार नाही.

१२. कोणतेही कारण न देता निविदा प्रक्रीया कोणत्याही टप्प्यावर थांबविणे किंवा नाकारण्याचे पूर्ण अधिकार मा. अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांनी राखून ठेवले आहेत.

१३. यशस्वी निविदाधारकाने वाहन ताब्यात घेताना अन्य मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्याचेकडून मालमत्तेच्या नुकसानीची भरपाई वसूल करण्यात येईल.

| अ.क्र. | निविदा प्रक्रीया तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर निविदा प्रसिध्द झाल्याचा दिनांक | दि. २० मार्च, २०२५. |
| २. | विक्री करावयाचे निर्लेखित साहित्य/वस्तू प्रत्यक्ष पाहण्याचा कालावधी (कार्यालयीन दिवशी) दिनांक व वेळ | दि. २० मार्च, २०२५ ते दि. ०१ एप्रिल, २०२५. दुपारी २.३० ते ४.०० |
| ३. | निविदा सादर करण्याचा कालावधी (कार्यालयीन दिवशी) | दि. ०२ एप्रिल, २०२५ ते दि.१७ एप्रिल,२०२५ दुपारी २.३० ते ४.०० |
| ४. | निविदा अंतिमरित्या सादर करण्याचा दिनांक व वेळ | दि. २१ एप्रिल, २०२५ |
| ५. | निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ निविदाधारकांना स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल. | दि.२२ एप्रिल, २०२५ |

# निविदा नमुना

दिनांक :- मार्च,२०२५.

प्रति,

कार्यासन अधिकारी (नोंदणी शाखा),
गृहनिर्माण विभाग, मंत्रालय-मुख्य इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई- ४०० ०३२.

विषय :- गृहनिर्माण विभागातील निर्लेखित वाहन क्र. MH-०१-AN-९११ (Toyota Altis १.८ VLYD (Petrol) आणि वाहन क्रमांक MH ०१ SA ४१४२ ( Honda City) ची लिलावाने विक्री करण्यासंदर्भात निविदा मागविण्याकरीता प्रसिध्दीपत्रक शासनाच्या वेबसाईटला प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ :- क्र.संकिर्ण-२०२४/प्र.क्र. १५/नों.शा., दि. ०३.२०२५.

महोदय,

गृहनिर्माण विभागातील निर्लेखित केलेले निर्लेखित केलेले वाहन क्र. MH-०१-AN-०९११(Toyota Altis १.८ VLYD (Petrol) आणि वाहन क्रमांक MH ०१ SA ४१४२ ( Honda City Petrol) ची विक्री करण्यासंदर्भात महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदा सूचनेस अनुसरुन मी सदर निविदा प्रक्रीयेमध्ये भाग घेऊ इच्छितो आहे. मी गृहनिर्माण विभागामार्फत विक्री करण्यात यावयाच्या वाहनांची पाहणी केली आहे. या प्रक्रीयेकरीता विहित केलेल्या अटी व शर्ती मला मान्य आहेत.

निविदा दरपत्रक

| अ.क्र. | संगणक सामुग्रीचे विवरण | एकूण नग | निविदा दर (प्रत्येक नग रुपये) |
|---|---|---|---|
| १ | वाहन क्र. MH-०१-AN-०९११(Toyota Altis १.८ VLYD (Petrol) | १ | रु.६९,४८५.०८/ ६९,४८५ (पूर्णांकात) |
| २ | वाहन क्रमांक MH ०१ SA ४१४२ ( Honda City Petrol) | १ | रु. ४१,३४३.६२ / ४१,३४४ (पूर्णांकात) |
| | एकूण (रुपये) | | १,१०,८२८.७ / १,१०,८२९ (पूर्णांकात |

आपला,

निविदा सादर करणाऱ्याचे /संस्थेचे नाव व पत्ता/स्वाक्षरी व दूरध्वनी क्रमांक

सोबत:- निर्लेखित साहित्य/वस्तू विक्री करण्यासंदर्भात नियम, अटी व शर्ती.

टिप:- (सदर निविदेसाठी आपली निवड झाल्यास ५ दिवसाच्या आत गृहनिर्माण विभाग (रोखशाखा), तिसरा मजला, दालन क्र.२५४ (मंत्रालय-विस्तार), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ येथे देकाराची रक्कम भरावी वाहन घेऊन जावे.)